# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१

☎ ०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail : mah-sforum@nic.in Website : https://grahak.maharashtra.gov.in/


जा.क्र.राआ/महा./आस्था-३/अर्ज/२०१५/३८४३ दिनांक ३०/०५/२०१५

प्रति,

१) प्रबंधक विधी,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, नागपूर व औरंगाबाद प.खंडपीठ

२) प्रबंधक,
सर्व जिल्हा ग्राहक मंच, महाराष्ट्र राज्य

**विषय :- राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या दैनंदिन कामकाजासाठी काही अधिकारी आणि कर्मचा-यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत.......**

संदर्भ :- कार्यासन अधिकारी (ना.पु.१२), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन पत्र क्र.संकीर्ण -१०१५/४९१/प्र.क्र.७२/ना.पु.१२, दि.१२ मे, २०१५ व त्यासोबत जाडलेले सदस्य सचिव, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे शासन पत्र क्र.रागांवितंआ/फाईल २०१५/प्र.क्र.०७, दि.२३ मार्च, २०१५

वरील संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने संदर्भिय शासन पत्रांन्वये कळविण्यात आले आहे की, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या दैनंदिन कामकाजासाठी आयोगामध्ये प्रतिनियुक्तीने काम करण्यास इच्छुक असणा-या पात्र अधिकारी व कर्मचा-यांकडून विनंती अर्ज आयोगाच्या सदस्य सचिवांकडे पाठविण्याची विनंती केली आहे.

सबब याद्वारे सर्व संबंधित अधिकारी व कर्मचा-यांना कळविण्यात येते की, वरील शासन पत्रात दिलेल्या सूचनानुसार जे अधिकारी व कर्मचारी आयोगाकडे काम करण्यास इच्छुक असतील त्यांनी त्यांचे विनंती अर्ज आवश्यक तपशिलासह दोन प्रतीत (एक मुळ प्रत) या कार्यालयास सादर करावीत. सोबत संदर्भिय शासनपत्रांच्या प्रती जोडलेल्या आहेत.

ASW 30/05/15

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

सोबत :- वरीलप्रमाणे

<u>महाराष्ट्र शासन</u>

क्र.संकीर्ण-१०१५/४९१/प्र.क्र.७२/ना.पु.१२
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : १२ मे, २०१५

प्रति,

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई,
२) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई,
३) प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई,
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई,
५) उपसंचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई,
६) उप संचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई,
७) राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती, मुंबई,
८) कार्यासन अधिकारी ना.पु.११, ना.पु.१५, ग्रा.सं.२, ग्रा.सं.३ व ग्रा.सं.४.

राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई
आवक क्र. 3485
दिनांक 16/05/2015
प्रबंधक स्वाक्षरी

विषय :-राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या दैनंदिन कामकाजासाठी काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियक्ती करण्याबाबत...

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, क्र.रागांवितंआ/फाईल २०१५/प्र.क्र.०७, दि. २३ मार्च, २०१५ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या दैनंदिन कामकाजासाठी आयोगामध्ये प्रतिनियुक्तीने काम करण्यास इच्छुक असणाऱ्या पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विनंती अर्ज आयोगाच्या सदस्य सचिवांकडे पाठविण्याची विनंती केली आहे. पत्राची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे.

२. वरील पत्रात दिलेल्या सूचनानुसार आयोगाकडे काम करण्यास इच्छुक असणाऱ्या आपल्या कार्यालयातील पात्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या विनंती अर्जासह आवश्यक तो तपशील मागवून, त्याची छाननी केल्यानंतर सदर तपशील परस्पर आयोगाच्या सदस्य सचिवांकडे पाठविण्यात यावा.

(ना. चं. इमडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत :- निवडनस्ती ना.पु.१२

91-

# राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : रागांवितंआ/फाईल २०१५/प्र.क्र.०७
सामान्य प्रशासन विभाग,
७ वा मजला, मंत्रालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२
दिनांक : २३ मार्च, २०१५.

प्रति,

सचिव,
अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय :- राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या दैनंदिन कामकाजासाठी कांही अधिकारी आणि कर्मचा-यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय साप्रवि क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र.२६८/का.३९, दि.२३.७.२०१४

२) रागांवितंआचे अधिकारी आणि कर्मचारी (सेवेच्या अटी व शर्ती) नियम, २०१४, दि.१.८.२०१४.

३) साप्रवि, का.१४, अनौसं.आरआर क्र.संकीर्ण १०१५/४०६/का.१४, दि.१८.३.२०१५.

महोदय,

महाराष्ट्र शासनाने सन २००४ च्या अधिनियम क्रमांक १५ अन्वये दिनांक २१ एप्रिल, २००५ पासून राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग या स्वायत्त आयोगाची स्थापना केली आहे. सदर अधिनियमाच्या कलम १२ अन्वये राज्य शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयानुसार निरनिराळया संवर्गातील एकूण २५ पदे मंजूर केली आहेत. सदर शासन निर्णयाची प्रत माहितीसाठी सोबत जोडण्यात आली आहे. या पदांवर नियुक्त करावयाच्या कर्मचारी आणि अधिका-यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विषयक नियम दिनांक १ ऑगस्ट, २०१४ च्या शासकीय अधिसूचनेनुसार राजपत्रामध्ये यापूर्वीच अधिसूचित करण्यात आले आहेत.

PS. FCSCPD
No.:

२.	आयोगासाठी मंजूर केलेल्या २५ पदांपैकी काही पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याचा विचार आहे. सदर पदे म्हणजे १) वरिष्ठ प्रशासकीय व वित्त अधिकारी (अवर सचिव दर्जाचे) २) प्रशासकीय अधिकारी (कक्ष अधिकारी दर्जाचे) ३) वित्त व लेखा अधिकारी (कक्ष अधिकारी दर्जाचे) ४) लेखापाल ५) उच्चश्रेणी लघुलेखक (इंग्रजी). यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या, का.१४ ने त्यांच्या उपरोक्त संदर्भानुसार अशी सूचना केली आहे की, आयोगाने सर्व मंत्रालयीन विभाग व त्या अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयाकडे संपर्क साधून प्रतिनियुक्तीसाठी इच्छुक असणा-या पात्र अधिकारी व कर्मचा-यांचा तपशील प्राप्त करुन घ्यावा.

३.	उपरोक्त पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी आवश्यक असणारा पदनिहाय तपशील म्हणजे पदनाम, पदाची वेतनश्रेणी, प्रशासकीय अर्हता, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी तपशील देणारे पदनिहाय जोडपत्र तयार करुन या पत्रासोबत जोडण्यात आले आहे. आपणास अशी विनंती करण्यात येते की, जोडपत्रांमध्ये दिलेल्या पदनिहाय तपशीलांनुसार आयोगास आवश्यक असणा-या उपरोक्त पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी आपल्या मंत्रालय विभाग आणि त्या विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालय यामध्ये आयोगाकडे काम करण्यास इच्छुक असणा-या पात्र अधिकारी आणि कर्मचा-यांकडून त्यांच्या विनंती अर्जासहित आवश्यक तो तपशील मागविण्यात यावा. तदनुसार आपणाकडे प्राप्त झालेल्या तपशीलाची छाननी केल्यानंतर सदर तपशील आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या सदस्य सचिवांकडे पाठविण्यात यावा.

सहपत्रे - पदनिहाय जोडपत्र

आपला स्नेहांकित

अ. वि. सप्रे

(डॉ. अ.वि.सप्रे)
आयोगाचे सदस्य सचिव

# जोडपत्र

१) **पदाचे नाव :- वरिष्ठ प्रशासकीय व वित्त अधिकारी (गट-अ) (अवर सचिव दर्जा )**

२) **पदाची संख्या :-** १

३) **पदाची वेतनश्रेणी (रुपये) :-** १५६००-३९१०० (ग्रेडपे ६६००)

४) **प्रशासकीय पात्रता आणि अर्हता :-** महाराष्ट्र शासन किंवा भारत सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रम किंवा सार्वजनिक उपयोगिता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ यांच्या सेवेत कोणत्याही समतुल्य अथवा समसंवर्ग पदावर कार्यरत;

५) **शैक्षणिक अर्हता :-**

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कला, विज्ञान किंवा वाणिज्य यापैकी कोणत्याही शाखेची पदवी धारण केली आहे आणि ज्यांना संगणकाचे ज्ञान आहे तथापि अतिरिक्त शैक्षणिक किंवा व्यवस्थापनामधील अर्हतेसहित पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या व्यक्तीला प्राधान्य दिले जाईल;

२) शासकीय किंवा निमशासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्र संस्था यामधील प्रशासन आणि वित्तविषयक बाबींचा किमान १० वर्षाचा अनुभव;

३) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले " संगणक परिचालन प्रमाणपत्र"

*********************************************

१) **पदाचे नाव :- प्रशासकीय अधिकारी (कक्ष अधिकारी दर्जाचे )**

२) **पदाची संख्या :-** १

३) **पदाची वेतनश्रेणी (रुपये) :-** ९३००-३४८०० (ग्रेडपे ४४००)

४) **प्रशासकीय पात्रता आणि अर्हता :-** महाराष्ट्र शासन किंवा भारत सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रम किंवा सार्वजनिक उपयोगिता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ यांच्या सेवेत कोणत्याही समतुल्य अथवा समसंवर्ग पदावर कार्यरत आहे आणि जिचा नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्याच्या रीतीकरिता विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व सेवेचा अनुभव;

५) **शैक्षणिक अर्हता :-**

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कला, विज्ञान किंवा वाणिज्य यापैकी कोणत्याही शाखेची पदवी धारण केली आहे आणि ज्यांना संगणकाचे ज्ञान आहे. तथापि अतिरिक्त शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीला प्राधान्य दिले जाईल;

२) शासकीय किंवा निमशासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्र संस्था यामधील प्रशासन आणि वित्तविषयक बाबींचा किमान ५ वर्षाचा अनुभव;

३) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले " संगणक परिचालन प्रमाणपत्र"

*********************************************

१) **पदाचे नाव :- वित्त व लेखा अधिकारी (गट-ब) (कक्ष अधिकारी दर्जाचे )**

२) **पदाची संख्या** :- १

३) **पदाची वेतनश्रेणी (रुपये)** :- ९३००-३४८०० (ग्रेडपे ४४००)

४) **प्रशासकीय पात्रता आणि अर्हता** :- महाराष्ट्र शासन किंवा भारत सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रम किंवा सार्वजनिक उपयोगिता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ यांच्या सेवेत कोणत्याही समतुल्य अथवा समसंवर्ग पदावर कार्यरत आहे आणि जिचा नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्याच्या रीतीकरिता विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व सेवेचा अनुभव;

५) **शैक्षणिक अर्हता** :-

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कला, विज्ञान किंवा वाणिज्य यापैकी कोणत्याही शाखेची पदवी धारण केली आहे आणि ज्यांना संगणकाचे ज्ञान आहे. तथापि अतिरिक्त शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीला प्राधान्य;

२) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले " संगणक परिचालन प्रमाणपत्र"

*************************************************

१) **पदाचे नाव :- लेखापाल (गट-ब)**

२) **पदाची संख्या** :- १

३) **पदाची वेतनश्रेणी (रुपये)** :- ९३००-३४८०० (ग्रेडपे ४३००)

४) **प्रशासकीय पात्रता आणि अर्हता** :- महाराष्ट्र शासन किंवा भारत सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रम किंवा सार्वजनिक उपयोगिता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ यांच्या सेवेत कोणत्याही समतुल्य अथवा समसंवर्ग पदावर कार्यरत आहे आणि जिचा नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्याच्या रीतीकरिता विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व सेवेचा अनुभव;

५) **शैक्षणिक अर्हता** :-

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कला, विज्ञान किंवा वाणिज्य यापैकी कोणत्याही शाखेची पदवी धारण केली आहे आणि ज्यांना संगणकाचे ज्ञान आहे. तथापि वित्त व्यवस्था आणि अर्थशास्त्र अथवा लेखाशास्त्र यामधील अतिरिक्त अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीला प्राधान्य;

२) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले " संगणक परिचालन प्रमाणपत्र"

*************************************************

१) **पदाचे नाव :- उच्चश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) (गट-ब)**

२) **पदाची संख्या** :- १

३) **पदाची वेतनश्रेणी (रुपये)** :- ९३००-३४८०० (ग्रेडपे ४४००)

४) **प्रशासकीय पात्रता आणि अर्हता** :- महाराष्ट्र शासन किंवा भारत सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रम किंवा सार्वजनिक उपयोगिता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ यांच्या सेवेत कोणत्याही समतुल्य अथवा समसंवर्ग पदावर कार्यरत आहे आणि जिचा नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्याच्या रीतीकरिता विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व सेवेचा अनुभव अशा व्यक्तीची प्रतिनियुक्ती;

५) **शैक्षणिक अर्हता** :-

१) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र एच.एस.सी. आणि इंग्रजी लघुलेखनामधील प्रति मिनिट १२० शब्द आणि इंग्रजी टंकलेखनामधील प्रति मिनिट ४० शब्द वेग असलेली अर्हता;

२) शासकीय किंवा निमशासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्र संस्था यामधील इंग्रजी लघुलेखनाचा किमान १ वर्षाचा अनुभव;

४) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले " संगणक परिचालन प्रमाणपत्र"

***********************************************